# आका झाले उदंड, कार्यकर्ते झाले गुंड, पालकमंत्री अजितदादांसमोर गुन्हेगारांना रोखण्याचे आव्हान?

अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचाराचा कर्दनकाळ
सायं.दैनिक महाराष्ट्र
आरंभ
संपादक : दिपक थोरात Mob.9860898564



■ बीड (महाराष्ट्र) ■ सायं.दैनिक ■ मराठी ■ वर्ष – ०२ ■ अंक – १७७ ■ रविवार दि.१६ मार्च २०२५ ■ आरएनआय – एमएएचएमएआर/२०२३/८३९६५ ■ किंमत ३ रू. । पाने ४
■ Beed (Maharashtra) ■ Daily Evening ■ Marathi ■ Year - 02 ■ Issue - 177 ■ Sunday Dt. 16 March 2025 ■ RNI : MAHMAR/2023/83965 ■ Price - 3 Rupees ■ Pages 4

# बीड जिल्ह्यात राजकीय गुंडगिरीला ऊत, कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न गंभीर!

## राजकीय नेत्यांच्या कार्यकर्त्यांमध्ये एवढा माज कुठून येतो? मुजोर कार्यकर्त्यांची फौज पोसणारे आका कोण?



गेवराई । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यात गुन्हेगारीच्या अनेक घटना उघडकीस येऊ लागल्या आहेत. बीडमधील या घटनांमुळे बीड बिहार बनले आहे की काय, असा प्रश्न राज्यभरातून उपस्थित होऊ लागला आहे. या घटनेमुळे बीडचा कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न गंभीर होत चालल्याचे चित्र आहे. गेल्या काही दिवसांपासून बीडमध्ये वारंवार हिंसक घटना घडत असून, दररोज मारहाणीचे व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल होत आहेत. तसेच महाराष्ट्राचा बिहार मानल्या जाणाऱ्या बीड जिल्ह्यात राजकीय गुंडगिरीला ऊत आला आहे. धनंजय मुंडे, सुरेश धस, संदीप क्षीरसागर यांच्यानंतर आता अजित पवारांच्या राष्ट्रवादीचे आमदार प्रकाश सोळंकेंचा कार्यकर्ता सुशील सोळंकेचा कारनामा समोर आला आहे. सुशील सोळंकेने मल्टि सर्व्हिसेस चालकाला मारहाण केली आहे.

### नेत्यांच्या मुजोर बगलबच्चांना पोलीस खाक्या का दाखवत नाही? राजकीय गुंडागर्दी कधी उखडून फेकली जाणार? मुजोर कार्यकर्त्यांच्या मुसक्या कधी आवळणार; याकडे लागले सर्वांचे लक्ष?

एवढंच नाही तर सुशील सोळंकेने थेट तहसिलदार आणि पोलिसांनाही शिवीगाळ केल्याचा व्हिडीओ व्हायरल झाला आहे. हा व्हिडीओ व्हायरल झाल्यानंतर आमदार प्रकाश सोळंकेंनी त्यावर स्पष्टीकरणही दिलं. सरपंच संतोष देशमुखांच्या निर्घृण हत्येनंतर बीड जिल्ह्यातील गुन्हेगारीचा मुद्दा चव्हाट्यावर आला आहे. त्यानंतर मंत्री धनंजय मुंडेंना राजीनामा द्यावा लागला. तर मुंडेंच्या राजीनाम्यानंतर धसांचा कार्यकर्ता खोक्या भोसलेच्या दहशतीचे आणि अमानुष मारहाणीचे व्हिडीओ समोर आले आहेत. हे सगळं एवढ्यावरच थांबलं नाही तर मुंडेंचे विरोधक असलेल्या पवारांच्या राष्ट्रवादीचे आमदार संदीप क्षीरसागर यांच्या पीएने शोरुम मॅनेजरला मारहाण केल्याचं समोर आलं. सर्वसामान्यांवर दहशत निर्माण करण्यासाठी अमानुष मारहाण करणं, पोलीस आणि प्रशासकीय अधिकाऱ्यांना धमक्या देणं, शिवीगाळ करण्याचे प्रकार बीड जिल्ह्यात सर्रास सुरु आहेत. मात्र राजकीय नेत्यांच्या कार्यकर्त्यांमध्ये एवढा माज कुठून येतो? अशा मुजोर कार्यकर्त्यांची फौज पोसणारे आका कोण? पोलीस नेत्यांच्या मुजोर बगलबच्च्यांना पोलीसी खाक्या का दाखवत नाहीत? असे अनेक प्रश्न निर्माण झालेत. त्यामुळे बीडमधील राजकीय गुंडागर्दी कधी उखडून फेकली जाणार आणि मुजोर कार्यकर्त्यांच्या मुसक्या कधी आवळल्या जाणार? याकडे सर्वांचे लक्ष लागले असून बीड जिल्ह्यात वाढत्या गुन्हेगारीच्या पार्श्वभूमीवर बीडचे पालकमंत्री तथा राज्याचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांनी विशेष लक्ष घालणे गरजेचे आहे. शिवाय बीड जिल्ह्यातील गुन्हेगारी रोखण्याचे आव्हान पालकमंत्री अजितदादांसमोर असणार आहे.

## जिल्हाधिकाऱ्यांची भेट घेऊन जाब विचारणार खोक्याचे घर पाडण्याची घाई का ? आ.धस

शिरुर कासार । प्रतिनिधी

बीड जिल्हा हा गुन्हेगारीचा बालेकिल्ला बनला आहे सध्या खोक्याच्या सुरू असलेल्या वादावरून आता आमदार सुरेश धस यांनी थेट जिल्हाधिकाऱ्यांना जाब विचार असल्याचे बोलले जात आहे यावेळी खोक्याचे घर पाडल्यामुळे याचा जाब आता बीडचे जिल्हाधिकारी अविनाश पाटील यांना आमदार सुरेश धस विचारणार असलेली चर्चा आहे खोक्याचे घर पाण्याची घाई का झाली कोणाचे आशीर्वादाने झाली कोणाच्या आदेशाने झाली यामध्ये कोणाचा हात आहे हे आता येणाऱ्या काळामध्ये कळेलच खोक्या उर्फ सतीश भोसले च्या घरावर बुलडोझर फिरवण्यात आल्यानंतर वन विभागाच्या जागेवर हे अनधिकृत घर बांधण्यात आल्याचा समोर आलं. आता सतीश भोसलेचे घर पाडण्यासाठी अतिघाई का केली ? असा जाब भाजप आमदार सुरेश धस वनविभागाला आणि कलेक्टर यांना विचारणार असल्याचं त्यांनी सांगितलं. खोक्या उर्फ सतीश भोसले च्या शिरूर कासार गावात असलेल्या घरावर बुलडोझर फिरवण्यात आल्यानंतर वन विभागाच्या जागेवर हे अनधिकृत घर बांधण्यात आल्याचा समोर आलं. आता सतीश भोसलेचे घर पाडण्यासाठी अतिघाई का केली ? असा जाब भाजप आमदार सुरेश धस वनविभागाला आणि कलेक्टर यांना विचारणार असल्याचं त्यांनी सांगितलं.

खोक्या उर्फ सतीश भोसले हा सुरेश धस यांचा कट्टर कार्यकर्ता आहे. सतीश भोसलेच्या शिरूर कासार गावातील घरावर बुलडोझर फिरवण्यात आल्यानंतर अनेकांकडून ती जमीन वन विभागाची असल्याचं म्हटलं तर काहींचं म्हणणं आहे ते जमीन वाटप करण्यात आली आहे. या घटनेत संपूर्ण माहिती घेऊन याबाबत कलेक्टर आणि वनविभागाला विचारणा करणार असल्याचे सुरेश धस यांनी सांगितल. सतीश भोसले याचे घर पाडण्यासाठी अति घाई केल्याचं सुरेश धस म्हणाले आहेत. तसेच मला देखील प्रश्न पडला आहे. की कृष्णा आंधळे कसा अटक होत नाही. मात्र तो लवकरात लवकर अटक व्हावा. अशी प्रतिक्रिया सुरेश धस यांनी दिली आहे. तर सतीश भोसले प्रकरणाची मी माहिती घेत असून काही जणांचे म्हणणे सतीश

भोसलेची जमीन वनविभागाची तर काहींचं म्हणणं ती जमीन वाटप करण्यात आली आहे. मात्र उद्या मी ठिकाणी जाणार असून माहिती घेईल. सतीश भोसले याचे घर पाडण्यासाठी अति जास्त घाई केली. अस म्हणत याबाबत कलेक्टर आणि वनविभागाला विचारणा करणार असल्याचे आ. सुरेश धस यांनी म्हटले आहे.



# बीड जिल्ह्यातील २६ पोलीस वाल्मिक कराडच्या मर्जीतले असल्याचे तृप्ती देसाई यांचे आरोप!

## बीड पोलिसांची तृप्ती देसाई यांना नोटीस; उद्या पोलीस अधीक्षक कार्यालयात हजर राहण्याचे आदेश

बीड । प्रतिनिधी
बीड जिल्ह्यातील मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणात वाल्मिक कराडला मुख्य आरोपी करण्यात आले आहे. देशमुखांच्या हत्येनंतर बीड पोलिसांच्या कार्यावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात होते. यानंतर सामाजिक कार्यकर्त्या तृप्ती देसाई यांनी सोशल मीडियावर पोस्ट करत वाल्मिक कराडच्या मर्जीतील अधिकाऱ्यांची यादीच जाहीर केली होती. आता बीड पोलिसांनी तृप्ती देसाई यांनी



नोटीस धाडली आहे.
तृप्ती देसाई यांनी बीड जिल्ह्यातील २६ पोलीस अधिकारी, कर्मचाऱ्यांच्या नावाची यादी देताना ते वाल्मिक कराडच्या खास मर्जीतले असल्याचे म्हटले होते.
जानेवारी महिन्यात त्यांनी ही यादी प्रसिद्ध केली होती. आता याबाबत बीडच्या पोलीस अधिक्षक कार्यालयाने दखल घेतली आहे. तृप्ती देसाईंना आता चौकशीसाठी बोलवण्यात आले असून १७ तारखेला त्यांना बीड पोलीस अधीक्षक कार्यालयात हजर राहण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

### 'त्या' पोलिसांना बीड बाहेर घालवण्याची वेळ : तृप्ती देसाई

याबाबत तृप्ती देसाई म्हणाल्या की, बीड जिल्ह्याचा गुंडाराज रोखायचा असेल तर या पोलीस अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना बीडबाहेर घालवण्याची वेळ आली आहे. वाल्मिक कराडला मदत करणाऱ्या बीड जिल्ह्यातील २६ पोलीस अधिकारी आणि कर्मचाऱ्यांची यादी मी जाहीर केली होती. याबाबत गृहमंत्रालय आणि पोलीस अधीक्षक बीड यांना देखील तक्रार दिली होती. जे आरोप मी केले होते, त्या संदर्भातले पुरावे घेऊन येण्यासाठी मला बीड पोलिसांनी नोटीस पाठवली आहे. या नोटीसला उत्तर देण्यासाठी सगळे पुरावे घेऊन मी १७ मार्च रोजी बीड पोलीस अधीक्षक कार्यालयात हजर राहणार आहे, असे त्यांनी म्हटले.

### दोषींचे निलंबन होणे गरजेचे : तृप्ती देसाई

तृप्ती देसाई पुढे म्हणाल्या की, बीडमध्ये वाल्मिक कराडच्या मर्जीनुसार अनेक पोलीस अधिकारी आणि कर्मचारी एकाच पोलीस स्टेशनमध्ये वर्षानुवर्ष काम करतात. अनेक गुन्हेगारांना त्यांनी पाठीशी घातले आहे. माझ्याकडे या कर्मचारी आणि अधिकाऱ्यांचे अनेक पुरावे ऑडिओ, व्हिडिओ स्वरूपात उपलब्ध आहेत. हे सर्व पुरावे घेऊन मी बीडला जाणार आहे. गृहमंत्री आणि बीडच्या पोलीस अधीक्षकांना माझी विनंती आहे की, तुम्हाला जे पुरावे हवे आहेत ते पुरावे देते.पण, जे दोषी आहेत त्या पोलीस अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना बीड जिल्ह्याच्या बाहेर काढा. जे दोषी आहेत त्यांचं निलंबन होणे गरजेचे असल्याचे देखील त्यांनी म्हटले आहे.

## पिंपळनेर येथील कुरेशी मीना जुनेद यांनी पहिला रोजा पूर्ण

पिंपळनेर । प्रतिनिधी
स्थानिक पिंपलनेर गावातील कुरेशी मीना जुनेद यांनी आपल्या आयुष्यातील पहिला रोजा यशस्वीपणे पूर्ण केला आहे. रमजानच्या पवित्र



महिन्यात पहिल्या रोज्याचे खास महत्त्व असून, मीनाच्या या आध्यात्मिक प्रवासाचे सर्वत्र कौतुक होत आहे. मीनाने अत्यंत निष्ठेने आणि संयमाने हा पहिला उपवास पूर्ण केला. तिच्या कुटुंबासह गावातील लोकांनी तिचे अभिनंदन केले. पहिल्या रोज्यानंतर मीनाला विशेष दुआ देण्यात आली आणि तिच्या उज्वल भविष्याच्या कामनेने लोकांनी तिला शुभेच्छा दिल्या. मीनाच्या आई-वडिलांनी आनंद व्यक्त करताना सांगितले की, आमच्या मुलीने पहिला रोजा पूर्ण केला, ही आमच्यासाठी खूप अभिमानाची गोष्ट आहे. अल्लाह तिच्यावर नेहमी मेहरबान राहो. हा प्रसंग गावासाठी एक प्रेरणादायी ठरला आहे, जिथे धर्म आणि संस्कृती यांचे सुंदर दर्शन घडते. कुरेशी मीना जुनेद हिच्या पुढील धार्मिक प्रवासासाठी सर्वजण शुभेच्छा देत आहेत.

## कुप्पा येथील रोहीदास काका जाधव यांचे वृद्धापकाळाने निधन

वडवणी । प्रतिनिधी



वडवणी तालुक्यातील कुप्पा येथील रहीवाशी आसणारे रोहिदा शेटीबा जाधव वय८५ वर्षे यांचे शनिवार दि १५ मार्च रोजी राहात्या घरीवृद्धाप काळाने निधन झाले.त्यांच्यावर कुप्पा येथील स्मशान भुमीत अंत्यसंस्कार करण्यात आले.ते कुप्पा ग्रामपंचायतचे मा सदस्य बाबुराव मामा जाधव यांचे चुलते, बबन जाधव त्रिंबक जाधव यांचे वडील पत्रकार शंकर जाधव यांचे आजोबा होते. सविस्तर वृत्त असे ग्रामीण भागातील जे पाटलांचे चिरेबंदी वाड्यांना दगडी चिऱ्यांच्या माध्यमातुन कसल्याही प्रकारचा सिमेंट चा वापर न करता चुण्याचा वापर करुन आपल्या हस्त कलांच्या माध्यमातुन चिरबंदी वाड्यांना सजवनारे जुने कारगीर म्हणुन तालुक्यात प्रसिद्ध आसणारे रोहीदास शेटीबा जाधव यांनी वयाच्या ८५ वर्षी अखेरचा श्वास घेतला.त्यांना संपुर्ण गावात काका या नावाने ओळखले जायचे काकांचा स्वभाव शांत संयमी मनमिळाऊ स्वाभावाचे व लहान थोरांशी सर्वांना गोड वानीने चांगले बोलत आसत त्यामुळे रोहीदास काका सर्वांना हवे हवे से वाटत. त्यांच्या पश्चात दोन मुल दोन मुली , जावई सुना नातवंड पतु आसा मोठा परीवार आहे. सायं दै महाराष्ट्र आरंभ परीवार सहभागी आहे.

## जप्त केलेली वाळू तहसीलदार यांच्या आदेशाने घरकुल लाभार्थ्यांना वितरण : पोटभरे



सिरसाळा । प्रतिनिधी
काल दिनांक महाराष्ट्र शासनाच्या वतीने प्रत्येक गरीब व्यक्तीला स्वतःचं घर असावे यासाठी रमाई घरकुल योजना सुरू करण्यात आली आहे. या योजनेअंतर्गत पात्र लाभार्थ्यांना घरकुलाचा लाभ मिळत आहे. परंतु घरकुल बांधण्यासाठी वाळू आवश्यक आहे. ज्याची सध्या अत्यंत वाढती किंमत आहे. यासंदर्भात रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया मराठवाडा तथापिली जिल्हाध्यक्ष शैलेंद्र पोटभरे यांनी जिल्हाधिकारी कार्यालय मोर्चा आणि निदर्शने आयोजित केली होती.
त्यांनी शासन स्तरावर पाठपुरावा केला आणि वाळू मिळवून देण्याचा यशस्वी झाले. आज शिरसाळा पोलीस ठाण्यात या जप्त केलेल्या वाळूचा वितरण कार्यक्रम आयोजित करण्यात आला. याप्रसंगी परळी तालुक्यातील गोरगरिबांना ज्यांना घरकुल मिळालेले आहे अशा गरजूंना घरकुल लाभार्थ्यांना वाळूचे वाटप करण्यात आली. या कामात शिरसाळा पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक.गोरखनाथ दहिफळे. शिरसाळा मंडळ अधिकारी गणेश फड. शिरसाळा पोलीस ठाण्याला आदर्श जिल्ह्यातील इतर पोलीस ठाण्याने घेणे गरजेचे असल्या चे म्हंटले आणि पोलीस तसेच लिलावातील वाळू साठा लाभार्थ्यांना वाटप करण्यात आली आहे.
यामध्ये एकतावादी रिपब्लिकन पार्टीचे मराठवाडा अध्यक्ष व बीड जिल्हा अध्यक्ष शैलेंद्र पोटभरे यांनी गोरगरिबांना स्वतःच घर बांधताना वाळू खूप मोठ्या प्रमाणात वाढ झालेली होती व ती रमाई घरकुल यांना विकत घेणे परवडत नसल्याने त्यांनी जप्त झालेली वाळू घरकुल लाभार्थ्यांना देण्यात यावी अशी तहसील कार्यालय परळी वैजनाथ येथे व कलेक्टर ऑफिस बीड येथे जाऊन लेखी स्वरूपात अर्ज देण्यात आले होते. त्यांनी ती मागणी केली व त्या मागणी मंजूर झाली असून लागलीच लाभार्थ्यांना वाळूचे वाटप करण्यात आले आहे.

## लोकशाही पत्रकार संघाच्या फरहान होडेकर, साईनाथ हांडे यांच्या निवड जाहीर

बीड । प्रतिनिधी
लोकशाही पत्रकार संघाच्या फरहान रऊफ होडेकर रत्नागिरी जिल्हा उपाध्यक्ष पदी यांची निवड रत्नागिरी जिल्हा अध्यक्ष फैमीदा शेख यांनी केली ,साईनाथ कल्याण हांडे पैठण तालुका कोषध्यक्ष पदी यांची निवड प्रदेश उपाध्यक्ष अनिस कुरेशी यांनी केली.यांची निवड भागवत (बीबी )वैद्य सं. अ. लोकशाही पत्रकार संघ महाराष्ट्र राज्य यांच्या आदेशानुसार, प्रदेश अध्यक्ष प्रताप साळुंके, राष्ट्रीय कार्यकारी अध्यक्ष - माणिक वाघमारे, राष्ट्रीय उपाध्यक्ष - संदीप जाधव, राष्ट्रीय कार्याध्यक्ष-मंगला वाघ, प्रदेश कार्याध्यक्ष -अयुब पठाण, आयेशाखान मुलानी, टीव्ही -युट्युब चॅनल विकास समितीचे प्रदेश अध्यक्ष महेबूब शेख, प्रदेश उपाध्यक्ष साजेद सय्यद, अनिस कुरेशी , वसीम आजाद, बालाजी अडियाल, प्रदेश अध्यक्ष महिला आघाडी-निलोफर शेख, श्रद्धा कंडूडे, प्रदेश कार्याध्यक्ष महिला उद्योग विकास समिती संध्या सरोदे,मराठवाडा अध्यक्ष - प्रभाकर पांडे, मराठवाडा सचिव यांच्या मार्गदर्शनाखाली निवड जाहिर केली आहे.





त्यांना लोकशाही पत्रकार संघाचे राष्ट्रीय अध्यक्ष संदीप जाधव मुंबई,राष्ट्रीय कार्याध्यक्ष मंगला वाघ मुंबई,प्रदेश ,प्रदेशाध्यक्ष महिला आघाडी निलोफर शेख, प्रदेश कार्याध्यक्ष महिला उद्योग विकास समिती संध्या सरोदे, प्रदेश उपाध्यक्ष रामदास तपसे केज,वसीम आजाद सिल्लोड,प्रभाकर पांडे नांदेड, प्रदेश सचिव हमीद खान जालना, कार्याध्यक्ष आयुब खान पठाण औरंगाबाद, मुंबई प्रदेश अध्यक्ष दत्तात्रय हंडीबाग केज, आत्माराम वाव्हाळ,बिलाल शेख, व लोकशाही पत्रकार संघाच्या पदाधिकारी या सर्वांनी पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या.
साईनाथ कल्याण हांडे यांची निवड पैठण तालुका कोषध्यक्ष पदी केली आहे. मु. पो. अंतरवाली खांडी, ता.पैठण जि. संभाजीनगर येथील रहिवाशी असून अनेक दैनिक मध्ये काम केले आहे. फरहान रऊफ होडेकर यांना रत्नागिरी जिल्हा उपाध्यक्ष पदी निवड हे राहणार खडक मोहल्ला, मस्जिद जवळ, मिरकरवडा, रत्नागिरी येथील असून ते सामाजिक कार्यकर्ते व पत्रकार आहेत.

## कुप्पा-चिंचाळा-पिंपरवाडा-आवरगांव रस्ता होत नाही तोपर्यंत गुत्तेदाराचे देयक दिल्यास उपोषणाचा ईशारा

धारूर । प्रतिनिधी
धारूर तालुक्यातील कृपा चिंचाळा पिंपळवडा आवर्गाव मार्गे रस्त्याचे काम मंजूर असून सदरील काम हे बोगस पद्धतीने गुत्तेदाराने करण्यात आले आहे .या कामाची चौकशीकरूनच सदरील गुत्तेदाराचे देयक देण्यात यावे अन्यथा आपल्या कार्यालयासमोर अमरण उपोषण करण्यात येईल असा इशारा निवेदनाद्वारे पिंपरवाड्याचे माजी सरपंच जयदेव तिडके यांनी सार्वजनीक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता अंबाजोगाई यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे .
कृप्पा-चिंचाळा-उपळी-गावंदरा-भोगलवाडी, पिंपरवाडा, आवरगांव रस्ता खडीकरणाचे मंजुर असुन सदरील काम हे भोगलवाडी फाटा ते भोगलवाडी पर्यंत केलेले आहे .त्यानंतर पिंपरवाडा ते आवरगांव पर्यंत काम केलेले आहे. सदरील रस्त्याचे काम हे अत्यंत निकृष्ट दर्जाचे करण्यात आलेले आहे. सदरील रस्त्याला साईड नाली देखील करण्यात आलेली नाही. सदरील काम हे गुत्तेदाराने मनमानी कारभार करून अत्यंत बोगस पध्दतीने केलेले आहे. सदरील काम हे पूर्ण झाले आहे , परंतु सदरील कामामध्ये डांबराचे प्रमाण अत्यंत कमी प्रमाणात वापरले असुन सद्यसिथतीत सदरील कामातील डांबर उखडुन खड्डे पडलेले आहेत.
गुत्तेदाराने सदरील काम अत्यंत निकृष्ट दर्जाचे केलेले आहे. सदरील काम अंजदापत्रकामध्ये नमुद बाबीप्रमाणे केलेले नाही. सदरील रस्त्यावरून वाहन देखील व्यवस्थीत चालविता येत नाही. पावसाळयामध्ये तरं सदरील रस्ता पुर्णपणे उखडुन जाऊ शकतो.
सदरील कामाची प्रत्यक्ष पाहणी करून सदरील काम हे गुत्तेदारास अंदाजपत्रकाप्रमाणे करण्याबाबत आदेशित करावे व जोपर्यंत सदरील काम हे अंदाजपत्रकप्रमाणे व चांगल्या पध्दतीने होत नाही तोपर्यंत सदरील कामाचे देयके गुत्तेदारास अदा करण्यात येऊ नयेत. जर आपण सदरील कामाचे देयके गुत्तेदारास अदा केले तर मी आपल्या कार्यालयासमोर आमरण उपोषणास बसणार असल्याचा इशारा कार्यकारी अभियंता यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे.

## जगात सर्वाधिक प्रदूषित २० पैकी १३ शहरे भारतात? काय आहेत प्रदूषणामागची कारणे?

स्विस एअर क्वालिटी टेक्नॉलॉजी कंपनी (आयक्यूएअर) या संस्थेच्या अहवालानुसार जगातील २० सर्वाधिक प्रदूषित शहरांपैकी १३ शहरे भारतात आहेत. ती कोणती आणि काय कारणे आहेत प्रदूषणामागची, ते जाणून घेऊ

### हवा गुणवत्ता अहवाल कसा तयार होतो?


स्विस एअर क्वालिटी टेक्नॉलॉजी कंपनी (आयक्यूएअर) दरवर्षी हवा गुणवत्ता अहवाल प्रकाशित करते. २०२४ चा अहवाल मंगळवारी ११ मार्च २०२५ रोजी प्रकाशित करण्यात आला. हा अहवाल तयार करताना जगभरातील ४० हजार हवा गुणवत्ता निर्देशांक देखरेख केंद्रांच्या माहितीचा आधार घेतला जातो. ही केंद्रे १३८ देशांतील ८,९५४ ठिकाणी आहेत. आयक्यूएअरचे हवा गुणवत्ता शास्त्रज्ञ या डेटाचे विश्लेषण करतात. हवेतील अतिसूक्ष्म धूलिकणांच्या (पीएम २.५) प्रमाणानुसार हवेची गुणवत्ता ठरते. ती सतत ढासळत असल्यास ते शहर प्रदूषित शहर ठरते.

### सर्वाधिक प्रदूषित शहरे भारतात

या अहवालानुसार, जगातील २० सर्वाधिक प्रदूषित शहरांपैकी १३ शहरे भारतात आहेत. दिल्ली ही जगातील सर्वात प्रदूषित राजधानी आहे. भारत हा जगातील पाचवा सर्वात प्रदूषित देश आहे.

### भारतातील कोणती शहरे?

आसाम राज्यातील आसाम आणि मेघालयच्या सीमेवर असणारे बर्निहाट हे शहर या यादीत पहिल्या क्रमांकावर आहे. म्हणजेच ते जगातील सर्वाधिक प्रदूषित शहर ठरले आहे. इतर शहरांमध्ये दिल्ली, पंजाबमधील मुल्लानपूर, हरियाणातील फरीदाबाद, लोणी, नवी दिल्ली, गुरुग्राम, गंगानगर, ग्रेटर नोएडा, भिवडी (हरयाणा-राजस्थान सीमेवरील राजस्थानच्या अल्वर



तालुक्यातील शहर), मुझफ्फरनगर, हनुमानगड आणि नोएडा यांचा समावेश आहे.

### जगातील कोणत्या शहरांचा समावेश?

पीएम २.५ म्हणजे हवेत असलेले २.५ मायक्रॉनपेक्षा लहान, अतिसूक्ष्म प्रदूषण कण. हे कण मानवी केसांपेक्षा ३० पट लहान असतात आणि ते सहजपणे फुप्फुसात आणि रक्तप्रवाहात शिरकाव करू शकतात. हवेतील अतिसूक्ष्म धूलिकणांमुळे हवा मोठ्या प्रमाणावर प्रदूषित होते. हवेच्या प्रदूषणामुळे भारतातील लोकांचे आयुर्मान अंदाजे ५.२ वर्षांनी कमी होत आहे. अतिसूक्ष्म धूलिकण श्वासोच्छ्वासावाटे फुप्फुसात जातात. तेथे ते साचून राहिल्यामुळे श्वासोच्छवासाशी संबंधित साध्या सर्दी, पडशापासून दम्यासारखे गंभीर आजार, हृदयविकार आणि कर्करोगासारखे गंभीर आजारही होण्याचा धोका असतो.

### प्रदूषणाची कारणे कोणती?

वाहनांचे उत्सर्जन, औद्योगिक कचरा, कार्बन उत्सर्जन, बांधकाम धूळ आणि पिकांचे अवशेष जाळणे ही भारतातील प्रदूषणाची प्रमुख कारणे आहेत. दिल्लीसारख्या शहरी भागात वाहतूक कोंडी, वाहनांच्या इंधन उत्सर्जनामुळे हवेतील अतिसूक्ष्म धूलिकणांत वाढ होत आहे. पंजाब आणि हरियाणा राज्यांमध्ये शेतीतील टाकाऊ कचरा (गव्हाचे पेंढे आदी) जाळल्यामुळे वायू गुणवत्ता खूप खराब होते. या भागातील हवेचा परिणामही दिल्लीवर होतो.
भारताची १३ शहरे जगात सर्वाधिक प्रदूषित म्हणून जाहीर झाली असली तरी २०२३ च्या तुलनेत २०२४ मध्ये देशातील एकूण प्रदूषणात किंचित घट झाली आहे, ही बाब भारतासाठी दिलासादायक आहे. २०२४ मध्ये भारत जगातील पाचव्या क्रमांकाचा सर्वाधिक प्रदूषित देश ठरला आहे. २०२३ मध्ये या क्रमवारीत भारत तिसऱ्या स्थानी होता. २०२३ च्या तुलनेत २०२४ मध्ये अतिसूक्ष्म धूलिकणांमध्ये सात टक्क्यांनी घट नोंदवण्यात आली आहे. दिल्लीतील प्रदूषणाची पातळी मात्र आणखी वाढली आहे. तेथे २०२३ मध्ये अतिसूक्ष्म धूलिकण प्रति घनमीटर १०२.४ मायक्रोग्राम होते ते २०२४ मध्ये वाढून १०८.३ मायक्रोग्राम प्रति घनमीटर झाले आहेत.

# 'लेडी सिंघम' शितलताई चाटे यांचा बीड शहर बचाव च्या वतीने नागरी सत्कार

## अनेक सामाजिक संघटना, प्रतिष्ठान, राजकीय पक्षांच्या वतीने सहभाग



बीड । प्रतिनिधी

रयत सामाजिक प्रतिष्ठानच्या वतीने दिल्या जाणाऱ्या राज्यस्तरीय कर्तव्यदक्ष महिला प्रशासकीय अधिकारी पुरस्काराने सन्मानित केल्यानंतर बीड जिल्ह्याच्या मुकुटामध्ये राज्यभर मानाचा तुरा रोवणाऱ्या बीडच्या कन्यारत्न ज्यांना महसूल विभागाच्या लेडी- सिंघम म्हणून ओळखल्या जातात, महसूल विभागाच्या वतीने ज्या नेहमीच 'लीड' रोलमध्ये असतात, सर्व जोखमीच्या मोहिमा लीड करतात, अशा या बीड जिल्ह्याच्या कर्तव्यदक्ष सुपुत्रिचा नागरी सत्कार 'बीड शहर बचाव मंचाच्या' वतीने करण्यात आला. यामध्ये मराठवाडा शिक्षक संघ, राष्ट्रीय काँग्रेस पार्टी, बीड जिल्हा कम्युनिस्ट पार्टी, भाजपा ओबीसी सेल, आधार व्यसनमुक्ती सेवा केंद्र, एसटी कामगार संघटना, संपादक व पत्रकार बांधव, जिल्हा वकील संघ, महसूल विभागाचे अधिकारी-कर्मचारी, मातृभूमी प्रतिष्ठान व शहरातील जेष्ठ मान्यवर नागरिक मोठ्या संख्येने सहभाग नोंदवला. शितलताई चाटे यांनी केलेल्या कर्तव्यदक्ष कार्याबद्दल व त्यांना मिळालेल्या सन्मानाबद्दल यांच्या वर शहरातून, जिल्ह्यातून व राज्यभरातून सर्व स्तरातून शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

राज्याच्या महसूल विभागामध्ये प्रथमतः अमरावती महानगरपालिके मधून रुजू झाल्यानंतर, तलाठी या पदावर काही दिवस काम करत असताना त्यांनी एक आगळीवेगळी ओळख शेतकऱ्यांच्या, गोरगरीब-नागरिकांच्या मनामध्ये त्यांच्या कामातून निर्माण केलेली आहे. तसेच जेव्हा कधीही गोरगरीब शेतकरी कुटुंबांवर नैसर्गिक व इतर संकटांचे डोंगर कोसळतात आणि त्यांच्या कार्यरत असलेल्या सर्कलच्या सज्जांमधील येणाऱ्या गावा-गावांमधील परिसरात कुठल्यातरी कारणाने त्रस्त होऊन व कंटाळून कुटुंबातील एखाद्या व्यक्तीने आत्महत्या केलेली असते तेव्हा तातडीने त्यांनी त्या ठिकाणी जाऊन त्या कुटुंबाची प्रत्यक्ष भेट घेऊन त्यांचे सांत्वन देखील नेहमीच केलेले आहे.अशा आत्महत्याग्रस्त कुटुंबांना वेळोवेळी शासनाकडून आर्थिक मदत व इतर योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी पूर्ण हातभार धडपडीने व धडाडीने त्या लावत असतात. याच पार्श्वभूमीवर त्यांना चांगल्या कामाची पोच पावती म्हणून मंडलाधिकारी- निरीक्षक या पदावर त्यांच्ये प्रमोशन झाले. त्या सध्या मंडळ निरीक्षक या महत्त्वाच्या पदावर बीड महसूल विभागामध्ये कार्यरत आहेत. प्रशासनाच्या माध्यमातून काम करत असताना अनेक अडी-अडचणींना त्यांना नेहमीच तोंड द्यावे लागते. काही दबाव तंत्राचा वापर करणाऱ्या लोकांचे फोन सुद्धा येतात..' अशा प्रकारे आमचा फेरफार घ्या तशा प्रकारे आमचा फेर घ्या,एखाद्या प्रकरणाचा निकाल आमच्या माणसाच्या बाजूने द्या.. परंतु कुठल्याही दबावाला बळी न पडता त्या प्रामाणिकपणे संविधानाच्या कायद्यानुसार, वेळोवेळी निघालेल्या जी.आर नुसार आणि नियमानुसार आपले कर्तव्य निस्वार्थपणे पार पाडतात.

मंडळ निरीक्षक म्हणून सध्या पाली सर्कल महसूल विभागामध्ये त्या आदर्श पद्धतीने कर्तव्य बजावत आहेत. महसूल विभागांमध्ये अशा आदर्श पद्धतीने कर्तव्य बजावणे ही देखील आजच्या काळात मोठी आश्चर्याची बाब ठरत आहे. पाली महसूल विभागामध्ये देखील त्यांनी मागच्या काळामध्ये तसेच सद्य वर्तमान काळामध्ये अनेक गोरगरीब शेतकऱ्यांना अवकाळी पावसाने पिकांचे नुकसान झाल्यानंतर शासनाकडून आर्थिक मदत मिळवून दिलेली आहे. अनेक किचकट अडीअडचणी व प्रसंगांना शिताफीने हाताळण्याची कमालीची हातोटी त्यांच्यामध्ये आहे. अशा अनेक कामांमध्ये त्यांच्या सातत्याच्या त्या करत असलेल्या प्रशासकीय कर्तव्य प्रयत्नांना त्यांना यश देखील आलेले आहे. एक आदर्श मंडळ निरीक्षक म्हणून पाली सर्कल मध्ये व महसूल विभागातच सध्या चर्चेत आहेत. याच पार्श्वभूमीवर मागच्या चार दिवसापूर्वी महाराष्ट्रातील नामांकित असलेल्या रयत सामाजिक प्रतिष्ठान यांच्या वतीने आदर्श कर्तव्यदक्ष प्रशासकीय महिला अधिकारी म्हणून राज्यस्तरीय पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. अशा कर्तव्यनिष्ठ व कर्तव्यदक्ष अधिकाऱ्यांच्या मागे बीड शहर बचाव मंच नेहमीच खंबीरपणे उभा राहत आलेला आहे आणि भविष्यातही उभाच आहे. बीड शहर बचाव मंचाच्या वतीने शितलताई चाटे यांचा नागरी सत्कार करण्यात आला.

याच पार्श्वभूमीवर बीड शहर बचाव मंचाच्यावतीने बीड शहरातील विविध संघटनांचा सहभाग घेऊन मा. शितलताई चाटे यांचा नागरी सत्कार त्यांच्याच कार्यालयामध्ये करण्यात आला. बीड शहरातील नामांकित बीड शहर बचाव या मंचाच्यावतीने सन्मानित करून त्यांच्या कार्याचे कौतुक करण्यात आले. यावेळी बीड शहर बचाव मंचाचे निमंत्रक तथा कार्याध्यक्ष, सर्व लोकांच्या सुखदुःखात सातत्याने सहभागी होणारे असे युवा नेते नितीनजी जायभाये व सर्व टीम या सत्कार प्रसंगी मोठ्या संख्येने उपस्थित होत होती. तसेच याच सत्काराचे औचित्य साधून मातृभूमी प्रतिष्ठानच्या वतीने देखील त्यांना सलमान पत्र प्रदान करून देऊन सन्मानित करण्यात आले.

तसेच या सत्कार प्रसंगी सर्वच मान्यवर उपस्थितांनी प्रशासकीय अधिकारी व कार्यपद्धती या विषयावर मार्गदर्शनपर चर्चात्मक मते मांडली व शितलताईंच्या पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या. यांप्रसंगी प्रमुख उपस्थितांमध्ये बीड शहर बचाव मंचाचे कार्याध्यक्ष नितीन जायभाये, बीड शहर बचाव मंचाचे चे प्रमुख मार्गदर्शक तथा मराठवाडा शिक्षक संघाचे अध्यक्ष, सचिव ज्येष्ठ कॉम्रेड डी.जी. तांदळे, बीड जि.कम्युनिस्ट पार्टीचे सचिव भाऊराव प्रभाळे, महाराष्ट्र एसटी कामगार संघटनेचे सुधीर देशमुख, साप्ताहिक समीकरण वार्ताचे मुख्य संपादक विजेंद्र सिंह डुलगच उर्फ भाईजी, मातृभूमी प्रतिष्ठानचे डॉ. संजय तांदळे, बाजीराव भाऊ ढाकणे, राष्ट्रीय काँग्रेस पार्टीचे शहराध्यक्ष तथा बीड शहर बचाव मंचाचे शहराध्यक्ष परवेज कुरैशी, उपाध्यक्ष टाटा सेठ, बीड शहर बचाव मंचाचे कायदेशीर सल्लागार व बीड जि.वकील संघाचे ॲड.अविनाश बारगजे, ॲड.नितीनजी वाघमारे, आम आदमी पार्टी जि.अध्यक्ष व बचाव मंचाचे सचिव अशोकराव येडे, आधार व्यसनमुक्ती सेवा केंद्राचे तेजसभाऊ घुमरे, संजय भडगळे, तलाठी किशोर लोखंडे, महसूल विभागाचे मंडल निरीक्षक महादेव जायभाये, तलाठी गायकवाड, अक्षरधाम संपादक तथा पत्रकार बालाजीभाऊ जगतकर, दैनिक न्याय टाइम्सचे पत्रकार संजय देवा कुलकर्णी, कुक्कडगावकर लोकशाही पत्रकार संघाच्या वतीने भागवत वैद्य, माजी नगरसेवक सुनीलभाऊ महाकुंडे, भाजपा ओबीसीचे जिल्हाध्यक्ष भुषणभाऊ राठोड, सेवा नि.प्राचार्य भास्करराव मिसाळ, शहरातील आदी मान्यवर, नागरिक, अधिकारी, कर्मचारी व पत्रकार बांधव हे मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# लिंबागणेश येथे छावा चित्रपट प्रदर्शित; अनुष्का रणखांबच्या वाढदिवसानिमित्त आयोजन



लिंबागणेश । प्रतिनिधी

छत्रपती संभाजी महाराजांचा ईतिहास नविन पिढी पर्यंत पोहोचवला गेला पाहिजे या दृष्टिकोनातून बीड तालुक्यातील लिंबागणेश येथे काल दि.१५ मार्च रोजी रात्री कु.अनुष्का शिवाजी रणखांब हिच्या वाढदिवसाच्या निमित्ताने छावा चित्रपटाचे आयोजन करण्यात आले होते. गावच्या प्रमुख चौकात मारोती मंदिरासमोर सोय करण्यात आली होती. चित्रपट सुरू करण्यापूर्वी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या अर्धाकृती पुतळ्याला अभिवादन करुन अनुष्का हिचा वाढदिवस साजरा केला. यावेळी अनुष्काच्या कुटुंबियांनी तिचे औक्षण केले. यावेळी डॉ.गणेश ढवळे, पत्रकार हरीओम क्षीरसागर, लेनाजी गायकवाड व ग्रामस्थ शुभेच्छा देण्यासाठी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

ईतिहास, भावना, उत्कटता, देशभक्ती, साहस दृष्ये यांचा सुरेख संगम साधला गेलेल्या अप्रतिम कलाकृती असलेल्या छावा चित्रपटात पहिल्यांदाच छत्रपती संभाजी महाराजांची ज्या क्रुर पद्धतीने औरंगजेबाने हत्या केली तो दुर्दैवी प्रसंग पाहताना अक्षरक्षः काळजावर दगड ठेवून छत्रपती संभाजी महाराजांना दिलेली वेदना पाहुन हृद्य पिळवटून जाते. भावना अनावर होतात. या प्रसंगी महिला भगिनी, तरूण वर्ग छत्रपती संभाजी राजांची वेदना पाहुन अगदी ढसाढसा रडत होते. चित्रपटाच्या शेवटी शिवगर्जना आणि घोषणाबाजी करण्यात आली. मुलीच्या वाढदिवसा निमित्ताने छावा चित्रपटाचे आयोजन करताना ग्रामीण भागातील लोकांना गावातच चित्रपट पहाता यावा यासाठी अनावश्यक खर्च टाळुन गावात चित्रपटाचे आयोजन करण्यात आल्याचे अनुष्काचे वडील शिवाजी रणखांब यांनी सांगितले.

# कोल्हारवाडी ता.बीड येथे भव्य कुस्ती आखाडा संपन्न



बीड । प्रतिनिधी

शिवसेना तालुकाप्रमुख गोरख अण्णा सिंघन यांचे गाव असलेल्या कोल्हारवाडी तालुका बीड येथे सालाबादप्रमाणे यंदाही काळुबाबा यात्रेनिमित्त गावकऱ्यांच्या वतीने भव्य कुस्त्यांचा आखाडा भरवण्यात आला होता. या आखाड्यात महाराष्ट्रातील नामवंत पैलवानांनी हजेरी लावल्यामुळे हा कार्यक्रम खूप रंगतदार झाला. विविध ठिकाणाहून आलेल्या जुन्या जाणत्या पैलवानांचा सन्मान करण्यात आला.

विशेषतहा महिला पैलवान यांची हजेरी हे विशेष आकर्षक पहायला मिळाले. २० रु.पासुन ते १०,००० रू पर्यन्त कुस्त्या लावण्यात आल्या.

या फडाला शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे जिल्हाप्रमुख गणेश भाऊ वरेकर व शिवसेना शिंदे गटाचे युवासेना मराठवाडा विस्तारक बाजीराव दादा चव्हाण यांनी भेट देऊन त्यांच्या वतीने, ५००१ रु.ची कुस्ती लावली. त्यांचा गावकऱ्यांच्या वतीने सत्कार करण्यात आला. या आखाड्यात जिल्हातून व परजिल्ह्यातील मल्ल मोठ्या संख्येने सामील झाले होते. शेवटी आलेल्या सर्व कुस्ती पट्टु व शौकिनांचे गावकऱ्यांच्या वतीने गोरख अण्णा सिंघन यांनी मनःपूर्वक आभार मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी गावातील सर्व युवक, जेष्ठ मंडळी यांनी एकत्र येऊन परिश्रम घेतले.




# कांशीराम यांचा आदर्श बहुजन कार्यकर्त्यांनी घ्यावा: शिंदे

बीड । प्रतिनिधी

मुक्ता सार्वजनिक वाचनालय बीड येथील कार्यालयात, बहुजन समाजातील क्रांतिकारक नेते मा.कांशीराम जी यांची ९१वी जयंती साजरी करण्यात आली. या प्रसंगी मा. कांशीराम जी यांच्या प्रतिमेस प्रा.डॉ.विठ्ठल जाधव व विठ्ठल भोसले साहेब यांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

या प्रसंगी प्रमुख वक्ते चंद्रप्रकाश शिंदे यांनी कांशीराम साहेब यांच्या बहुजन चळवळीतील कार्य, त्यांचे संघटन कौशल्य, शिस्तबद्धता, चळवळी बाबतीत निष्ठा व समर्पण यांची विविध प्रसंग सांगून मनोगत व्यक्त केले. मुक्ता सार्वजनिक वाचनालय बीड, अध्यक्ष आयु. भाग्यविधाता साळवे यांनी त्यांच्या मनोगतमध्ये परिवर्तन हे होण्यासाठी, आदर्श व्यक्तिमत्व डोळ्यासमोर ठेऊन कार्य केले पाहिजे. यावेळी मा.कांशीराम साहेब यांच्या सोबत चळवळीत कार्य केलेले, कार्यकर्ते जे.टी. साळवे साहेब यांचा सत्कार करण्यात आला. सूत्रसंचालन हर्षरत्न साळवे यांनी केले, तर आभार प्रदर्शन श्रुती साळवे यांनी मानले.



# आदित्य मसने याची बॉल बॅडमिंटन स्पर्धेसाठी विद्यापीठ संघात निवड

अंबाजोगाई । प्रतिनिधी

स्वामी रामानंद तीर्थ महाविद्यालयाचा एम कॉम. प्रथम वर्षात शिकत असलेला आदित्य मसने याची बैंगलुरु नार्थ युनिव्हर्सिटी कर्नाटक येथे होत असलेल्या बॉल बॅडमिंटन स्पर्धेसाठी निवड झाली. या खेळाडुला क्रीडा विभाग प्रमुख डॉ. प्रविण भोसले यांनी मार्गदर्शन केले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. पि.आर. थारकर यांच्या हस्ते पुष्पगुच्छ देवून सत्कार करण्यात आला आणि पुढील स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

# वनविभागाने सुप्रीम कोर्टाच्या आदेशाची पायमल्ली केली तात्काळ गुन्हे दाखल करा : प्रा. किसन चव्हाण

बीड । प्रतिनिधी

शिरूर या ठिकाणी आदिवासी, वडार, भिल्ल, पारधी वस्तीवरील लोकांचे रहाते घर अज्ञात गाव गुंडाकडून जाळण्यात आले व त्याची तोडफोड करण्यात आली यामध्ये लोकांच्या घरातील संसार उपयोगी सर्व वस्तू जळून खाक झाले असून शेळ्या, कोंबड्या, बदक जळून गेले आहेत. तीस वर्षाचा संसार जिल्हा प्रशासनातल्या काही अधिकारी कर्मचाऱ्यांच्या आडमुठ्या भूमिकेमुळे उघड्यावर पडला आहे. आमदार-खासदार मंत्री पटीविधिमंडळामध्ये शपथ घेत असताना मी कुणाविषयीही ममत्व आकस भाव बाळगणार नाही शिरूर तालुक्यातील भटक्या प्रमुख त्यांची घर पाडण्यात आलेले आहेत ती घर राजकीय मंडळींच्या आदेशाने घरे पाडण्यात आलेली आहेत असा दाट संशय येतो आहे.

वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष ड. प्रकाश आंबेडकर यांच्या आदेशान्वये वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय सदस्य तथा राज्य उपाध्यक्ष प्राध्यापक किसन चव्हाण राज्य प्रवक्ते ट्रॉसिटी अरुण आबा जाधव जिल्हाध्यक्ष अजय सरवदे यांच्यासह सर्व जिल्हा तालुका कार्यकारिणी यांनी भेट देत पाहणी केली. बेकायदेशीररित्या घरे पाडणाऱ्या वन विभागाच्या अधिकाऱ्यावर गुन्हे दाखल करत त्यांच्यावर कड्क शासन करावे अशी मागणी वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय सदस्य तथा राज्य उपाध्यक्ष प्रा.किसन चव्हाण यांनी केली, शिरूर वस्ती जळणाऱ्या गावगुंडांचा तात्काळ शोध घ्यावा अन् अटक करावे अशी मागणी राज्य प्रवक्ते ड.अरुण आबा जाधव यांनी केली.



यावेळी वंचित बहुजन आघाडीचे जिल्हाउपाध्यक्ष ज्ञानेश्वर कवठेकर, सचिन मेघडंबर, भीमराव औसरमल, अर्जुन जवंजाळ, धम्मानंद साळवे, अंकुश जाधव,राजेशकुमार जोगदंड, विष्णू देवकाते, सम्यक विद्यार्थी आंदोलनचे जिल्हाध्यक्ष रोहन मगर, ता.अध्यक्ष दिलीप माने, किरण वाघमारे, बाळासाहेब गायकवाड, मनोहर औसरमल, लखन जोगदंड, मिलिंद सरपते, अमर ससाणे, दीपक थोरात, किशोर भोले, प्रमोद निकाळजे, राहुल शिरोळे यांच्यासह असंख्य पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

शिरूर येथील घडलेली घटना अत्यंत वेदनादायी आहे. आदिवासी भिल्ल पारधी वडार यांचा वस्तीवरील घरे गावगुंडांनी जाळली त्यामध्ये मुके जनावरे, पक्षी सुद्धा जळाले इतकी क्रूर मानसिकता दिसून आली. बीड जिल्हा प्रशासनावर राजकीय दबाव तंत्राचा वापर होत आहे. त्यामुळेच तर संबंधित लोकांना ७ दिवसाच्या आत अतिक्रमण काढावे अशी नोटीस देऊन दुसऱ्याच दिवशी त्यांची घरे वन विभागाने जेसीबीद्वारे पाडली हे निषेधार्य आहे.

– **अजय सरवदे,** जिल्हाध्यक्ष, वंचित बहुजन आघाडी बीड (प)

# बीडमध्ये चाललंय तरी काय? संतोष देशमुखांसारखीच आणखी एकाची हत्या?

## दोन दिवस डांबून ठेवत मारहाण; ट्रक ड्रायव्हरचा मृत्यू

बीड । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यातील मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांचे अपहरण करुन निर्घृणपणे हत्या करण्यात आली. या घटनेने महाराष्ट्रातच नाही तर देशभरात खळबळ उडाली.

### याप्रकरणातील आरोपींना कठोरात कठोर शिक्षा व्हावी, अशी मागणी जोर धरत आहे?



या प्रकरणातील आरोपींना कठोरात कठोर शिक्षा व्हावी अशी मागणी जोर धरत आहे. सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरण ताजे असतानाच आता बीडमध्ये आणखी एक धक्कादायक घटना घडली आहे. एका तरुणाला डांबून ठेवत बेदम मारहाण करण्यात आली आणि या मारहाणीत तरुणाचा मृत्यू झाला आहे.

आष्टी तालुक्यातील पिंपरी घुमरी येथे एका ट्रक मालकाने ट्रक चालकाला दोन दिवस डांबून ठेवत मारहाण केली. ही मारहाण इतकी निर्घृणपणे केली की यात त्या चालकाचा मृत्यू झाला. आता या प्रकरणात आष्टी पोलिसांनी या मालकाला ताब्यात घेतले असून अधिक तपास सुरू आहे. बीडमध्ये घडलेल्या या घटनेने एकच खळबळ उडाली आहे.

मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार, विकास बनसोडे (रा.जालना) हा पिंपरी घुमरी येथील क्षीरसागर नावाच्या व्यक्तीच्या कवर चालक म्हणून कामाला होता. विकास आणि ट्रक चालक यांच्यात काही कारणावरुन जोरदार वाद झाला. वाद झाल्याने राग आल्याने ट्रक मालक क्षीरसागर याने विकास बनसोडे याला डांबून ठेवले. विकास बनसोडे याला डांबून ठेवत त्याला बेदम मारहाण केल्याचा आरोप विकासचा भाऊ आकाश बनसोडे याने केला आहे. या प्रकरणात आता आष्टी पोलिसांनी एका संशयितास ताब्यात घेतले असून अधिक तपास सुरु आहे.

दरम्यान या प्रकरणात गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु असल्याचे आष्टी पोलिसांनी सांगितले. या प्रकरणावर अंजली दमानिया यांनी एक्सवर पोस्ट करत हे सर्व कधी थांबणार असा प्रश्न उपस्थित होत आहे. आपल्या ट्वीटमध्ये अंजली दमानिया म्हणतात, पुन्हा स्व संतोष देशमुखांसारखीच घटना ? ही माणसं आहेत की जनावरं? आष्टी तालुक्यातील पिंपरी (घुमरी) विकास बनसोडे या युवकाचा खून... आष्टी तालुक्यातील पिंपरी घुमरी येथील भाऊसाहेब शिरसागर यांच्याकडे विकास बनसोडे वय वर्ष २५, हा जालना तालुक्यातील युवक ट्रक ड्राइवर म्हणून, गेले ४ वर्ष कामाला होता. या युवकाचा जागीच मृत्यू झाला. मृत्यू झाल्याचे कळताच कडा चौकीला कळवण्यात आले. एक आरोपीला अटक झाली असे सांगण्यात आले.



# अजितदादा बीड जिल्ह्यातून विधानसभेमध्ये संजय दौंड यांना संधी देऊ शकतात

मुंबई । प्रतिनिधी

राज्यातील ५ विधानपरिषद निवडणुका होत असून उद्या उमेदवारी अर्ज दाखल करण्यात येणार आहेत. या पार्श्वभूमीवर भाजपाकडून तीन उमेदवारांची नावे घोषित करण्यात आली तर शिवसेनेनेही आपला उमेदवार निवडला आहे. तर अजित पवार यांच्या राष्ट्रवादीकडून तीन नावे चर्चेत असून आज दुपारी बैठक घेऊन त्यातील एक नाव निश्चित करण्यात येणार आहे.

राज्यातील विधानपरिषदेच्या पाच रिक्त जागांसाठी येत्या २७ मार्च रोजी मतदान प्रक्रिया पार पडणार आहे.

महायुती सरकारमध्ये या पाचपैकी तीन जागा भाजपच्या वाट्याला येणार आहे. या तीन जागांसाठी भाजपकडून उमेदवारांची नावे जाहीर करण्यात आली आहेत. त्यामध्ये दादाराव केचे, संजय केणेकर आणि संदीप जोशी यांना संधी देण्यात आली आहे. या तिन्ही नेत्यांना उमेदवारी अर्ज भरण्याच्या सूचना देण्यात आल्याची माहिती आहे. त्यामुळे भाजपचे ज्येष्ठ आणि निष्ठावंत नेते माधव भंडारी यांची संधी पुन्हा एकदा हुकली आहे. भाजपकडून विधानपरिषद उमेदवारांच्या दिल्लीला पाठवण्यात आलेल्या यादीत माधव भंडारी आणि अमरनाथ राजूरकर यांच्या नावाचा समावेश असल्याचे सांगितले जात होते. मात्र, आता अंतिम यादीत दादाराव केचे, संजय केणेकर आणि संदीप जोशी यांना संधी मिळाली आहे. विधानपरिषदेच्या रिक्त झालेल्या एकूण ५ जागांपैकी ३ जागा भाजपच्या कोट्यात तर शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेसकडे प्रत्येकी एक जागा आहे. उद्या उमेदवारी अर्ज दाखल करण्याचा शेवटचा दिवस आहे.

त्यापूर्वी आज भाजपकडून तीन उमेदवारांची नावे निश्चित करण्यात आली आहेत. तर शिवसेने कडून चंद्रकांत रघुवंशी यांना संधी देण्यात येणार असल्याचे सांगितले आहे. यामुळे आता अजित पवार यांच्या निर्णयाकडे लक्ष लागले आहे. अजितदादांच्या राष्ट्रवादी काँग्रेसकडूनही विधानपरिषदेवर जाण्यासाठी इच्छुकांची गर्दी दिसत आहे. राष्ट्रवादी काँग्रेसच्या कोअर कमिटीकडून झिशान सिद्दीकी, संजय दौंड आणि उमेश पाटील यांना उमेदवारी अर्ज भरण्यासाठी कागदपत्रं तयार ठेवण्याच्या सूचना देण्यात आल्याची माहिती आहे. या तिघांपैकी एकाला विधानपरिषदेवर संधी मिळणार असल्याचं बोललं जात आहे. राजेश विटेकर विधानसभेत गेल्यानं राष्ट्रवादी काँग्रेसची एक जागा रिक्त आहे. या जागेसाठी १०० हून अधिक इच्छुकांचे अर्ज आले होते. त्यामुळे अजित पवार आता विधान परिषदेवर कोणत्या नेत्याला संधी देणार, याकडे सर्वांच्या नजरा लागल्या आहेत. यासाठी आज दुपारी बैठक बोलावली असल्याचे समजते.

# दहशत माजवणाऱ्याविरुध्द पोलीसांची दबंग कारवाई



माजलगाव । प्रतिनिधी

माजलगांव शहरातील दिनांक १४/०३/२०२५ रोजी छत्रपती शिवाजी चौक येथे इसम नामे अमोल बबनराव गावडे रा. पंचशीलनगर माजलगाव हा अवैधरित्या स्वतःचे ताब्यात तलवार बाळगून परीसरात दहशत माजवत असल्याची माहिती माजलगांव शहर पोलीसांना मिळाल्याने नमुद इसमाविरुध्द पोलीसांनी १८.०५ वाजता छापा मारून त्यास तलवारीसह ताब्यात घेऊन त्याचे ताब्यातून एक लोखंडी तलवार जप्त करण्यात आली असुन अमोल बबनराव गावडे रा. पंचशीलनगर माजलगाव याचे विरुध्द भारतीय हत्यार कायदा कलम ४/२५ अन्वये कारवाई करण्यात आली.

सदरची कारवाई नवनित कॉवत, पोलीस अधीक्षक बीड, श्रीमती चेतना तिडके, अप्पर पोलीस अधीक्षक अंबाजोगाई, नीरज राजगुरु पोलीस उपअधीक्षक उपविभाग गेवराई, अति. पदभार माजलगांव यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक राहुल सुर्यतळ, पोलीस उपनिरीक्षक आकाश माकणे, पोहेकॉ/ किशोर जाधव, पोलीस अंमलदार सुनिल गवळी यांनी केली आहे.

# रयत सामाजिक प्रतिष्ठान चा राज्यस्तरीय समाजरत्न पत्रकारिता पुरस्कार भागवत वैद्य यांना प्रदान

बीड । प्रतिनिधी



रयत सामाजिक प्रतिष्ठान चा राज्यस्तरीय समाजरत्न पत्रकारिता पुरस्कार दरवर्षी विविध क्षेत्रात उत्कृष्ट कार्य करणाऱ्या लोकांना मान्यवरांच्या हस्ते देण्यात येतोय. यावर्षी रयत सामाजिक प्रतिष्ठान राज्यस्तरीय समाजरत्न पत्रकारिता पुरस्कार सोहळा २०२५ चा भागवत वैद्य यांना प्रदान करण्यात आला.

यावेळी सामाजिक कार्यकर्ते, सिने अभिनेते उपस्तित होते. भागवत वैद्य यांनी आपली पत्रकारिता समाजसेवा म्हणून केली. अनेक लोकांचे प्रश्न आपल्या लेखणीतून सोडविले आहेत. लोकशाही पत्रकार संघांचे सं. अ. भागवत वैद्य यांचे खूप अभिनंदन सर्व स्तरातून होतं आहे.



# पारधी समाजाचे १२ घरे वनविभागाने जेसीबीने पाडून त्यांना आग लावली

बीड । प्रतिनिधी

झापेवाडी तालुका शिरूर जिल्हा बीड येथील पारधी वस्तीवर झालेल्या हल्ला व त्या हल्ल्यांमध्ये अनेक जणांना रुग्णालयात दाखल करावे लागले आहे या घटनेचा निषेध करावा तेवढे कमीच आहे. महाराष्ट्रामध्ये दलित, आदिवासी, ओबीसी समाज सुरक्षित आहे का या समाजाला आपापसात भांडण करायला लावून त्याचा फायदा अनेक उच्चवर्णीय नेतेमंडळी बीड जिल्ह्यात घेताना दिसत आहेत परंतु बीड जिल्ह्यामध्ये एक आगळे वेगळे वातावरण निर्माण झाले आहे.

या वातावरणामुळे गुना गोविंदाने नांदणारे समाज आता एकमेकांकडे शंकेच्या नजरेने पाहत आहेत याचाही विचार शासनाने करणे गरजेचे आहे बीड जिल्हा सध्या पूर्ण महाराष्ट्रात गाजत चालला आहे याचा परिणाम स्पष्टपणे जिल्ह्यात दिसून येत आहे याचे मुख्य कारण म्हणजे रक्तरंजित राजकारण याला फक्त आणि फक्त संविधानिक पदावर म्हणजेच निवडून आलेले व्यक्ती कारणीभूत आहेत अशी चर्चा आता बीड जिल्ह्यामध्ये रंगू लागली आहे याचा आम्ही लोक जनशक्ती पार्टीच्या वतीने जाहीर निषेध करत आहोत झापेवाडी तालुका शिरूर जिल्हा बीड येथे भेट दिली असता समवेत भीमशक्तीचे बीड जिल्हा कार्याध्यक्ष भीमराव सरवदे लोक जनशक्ती पार्टीचे मराठवाडा प्रदेशाध्यक्ष राजेश वाहुळे कॉम्रेड बब्रुवान पोटभरे धीमंत राष्ट्रपाल सुमित आवाडे व इतर

# सरकार आणखी किती आश्रम शाळेतील शिक्षकांचा बळी घेणार?

## शिक्षकांचा जीव गेल्यानंतर आश्रमशाळेतील कर्मचाऱ्यांना व्ही जे एन टि संहिता लावुन १००% वेतनश्रेणी प्रमाणे अनुदान देणार का..?

बीड । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यातील केज तालुक्यात मागील अठरा वर्षापासून विना वेतन काम करणाऱ्या व २०१९ साली २०% अनुदानास पात्र ठरून ही अद्याप वेतन न मिळालेल्या एका आश्रम शाळेतील धनंजय नागरगोजे नावाच्या शिक्षकांनी आपल्या हक्काच्या वेतनासाठी आत्महत्या करून आपले जीवन संपवले. धनंजय नागरगोजे यांच्या आत्महत्ये नंतर बीड जिल्ह्यासह राज्यातील आश्रमशाळा शिक्षक आणि शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या कर्मचाऱ्यातून संताप व्यक्त होत आहे. सरकार आणखी किती आश्रमशाळेतील शिक्षकांचा बळी घेणार? शिक्षकांचा जीव गेल्यानंतर आश्रमशाळेतील कर्मचाऱ्यांना व्ही जे एन टि संहिता लावुन १००% वेतनश्रेणी प्रमाणे अनुदान देणार का..? असा संतप्त सवाल करत तातडीने राज्यातील सर्व आश्रम शाळांना अनुदान द्यावे अन्यथा तीव्र आंदोलन करण्याचा इशारा राज्यातील आश्रम शाळा शिक्षक शिखर कर्मचारी संघटनेच्या वतीने देण्यात आला आहे.

बीड जिल्ह्यातील शाहु, फुले, आंबेडकर आश्रमशाळेत काम करणाऱ्या विनाअनुदानित शिक्षक नागरगोजे सरांनी १८ वर्षापासून वेतन नसल्याने आत्महत्येचे टोकाचे पाऊल उचलले ही महाराष्ट्रासाठी अत्यंत खेदाची बाब आहे. एकीकडे शाहू- फुले-आंबेडकर यांच्या नावाची भाषणात गर्जना करायची आणि दुसरीकडे महाराष्ट्रातील २० वर्षापासुन सुरू असलेल्या शाहू-फुले-आंबेडकरांच्या नावाने सुरू असलेल्या १६५ आश्रमशाळांना अनुदान द्यावयाचे नाही असे दुटप्पी धोरण शासन राबवत आहे.

ही अत्यंत खेदाची व चिंताजनक बाब आहे हे कुठे थांबवणे महत्वाचे आहे. महाराष्ट्रातील १६५ आश्रमशाळेच्या अनुदानासाठी सखोल तपासण्या झाल्या या मध्ये १६५ आश्रमशाळा पात्र होऊन देखील अद्याप या शाळेतील कर्मचाऱ्यांना कसल्याच प्रकारचे कामाचे वेतन मिळत नाही. आपल्या हक्काच्या पगारासाठी आश्रमशाळा कर्मचारी संघटनेच्या माध्यमातून शेकडो आंदोलन केले ५८ आमरण उपोषण केले. तरीही अद्याप न्याय मिळत नाही. अठरा वर्षे बिनपगारी काम करून देखील हक्काचा पगार मिळत नसल्याने नैराश आलेल्या पाच ते सहा शिक्षकांनी आत्महत्येचे पाऊल उचलले आहे. या पुढे जर अनुदान मिळाले नाही तर आणखी किती आत्महत्या होतील हे सांगता येणार नाही. अनुदान न मिळाल्यामुळे शिक्षकांच्या पदरी निराशाच आली आहे. एका बाजुला अनुदान नाही दुसरीकडे कुटुंबांचा खर्च भागविणे अवघड चालले आहे. त्यामुळे आश्रमशाळेतील कर्मचारी चिंताग्रस्त, निराशमय जीवन जगत आहे. याच निराशेतून धनंजय नागरगोजे शिक्षकांनी आत्महत्या सारखे पाऊल उचललेले आहे.

सरकारने जर आश्रमशाळांना अनुदान दिले असते तर नागरगोजे सरांचा जीव वाचला असता. सरकारला अजुन किती आश्रमशाळेतील शिक्षकांचा बळी घ्यायचा आहे? असा संतप्त सवाल शाहु, फुले, आंबेडकर, आश्रमशाळा शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी संघटनेचे राज्य अध्यक्ष अविनाश काळे, राज्य सचिव अतिक अन्सारी, राज्य उपाध्यक्ष- विलास पवार, अविनाश साखरे, सहसचिव किरण बोरूडे, कोषाध्यक्ष सी.डी.पाटील, कार्याध्यक्ष देविदास जरांगे पाटील, राज्य समन्वयक विनोद राठोड, राज्य महिलाअध्यक्ष निता भंगारे, राज्य कार्यवाहक घनश्याम राठोड, राज्य सहसन्वयक बाबुराव पवार, राज्य प्रसिद्धीप्रमुख शहानवाज खान, राज्य सभासद सुभाष कराड, संदिप खरे, मुकुंद कदम, दत्ता गिरी, गणेश साखरे, एकनाथ आघाव, विनोद भोंडवे आदिंनी उपस्थित केला आहे. दरम्यान शाहू, फुले, आंबेडकर, आश्रमशाळाना व्हिजेएनटी नुसार १००% वेतनश्रेणी प्रमाणे अनुदान द्यावे व भरीव आर्थिक तरतूद करावी अन्यथा राज्यात तीव्र आंदोलन करण्याचा इशारा शाहू-फुले-आंबेडकर आश्रमशाळा शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी दिला.

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक इंदर थोरात यांनी निर्मिती प्रिंटस्, धोंडीपुरा, टिळक रोड, जोशी नर्सिंग होमसमोर, बीड ता.जि.बीड-४३११२२ येथे छापुन कार्यालय सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ, घर नं.१-७-३८१,जुन्या पोलीस अधीक्षक कार्यालयाजवळ, थोरातवाडी बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - दीपक इंदर थोरात

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER DEEPAK INDAR THORAT AT THE NIRMITI PRINTS,TILAK ROAD , DHONDIPURA, IN FRONT OF JOSHI NURSING HOME, BEED, TQ.BEED DIST.BEED-431122 (MH) AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAILY EVENING MAHARASHTRA AARAMBH , H.NO.1-7-381, NEAR OLD S.P. OFFICE,THORATWADI, BEED TQ.DIST.BEED -431122 EDITOR - DIPAK INDAR THORAT